वाचले :- १ महानगरपालिका सभा ठराव क्र. ५०२४ दिनांक १०/१०/२००३
२ केंद्र शासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन NO.1/3/2008-E.II(B) Date 28 March 2018
3 केंद्र शासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन NO.1/3/2008-E.II(B) Date 11 September 2018
४ दिनांक ८/१०/२०१८ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. लेखा विभाग
क्रमांक :- लेखा/३२/कावि/१५८७/२०१८
दिनांक:- १२/१०/२०१८

**विषय** :- महानगरपालिका निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना दि.१/१/२०१८ पासुन (१४२%) व दि.१/७/२०१८ पासुन (१४८%) सुधारीत दराने महागाई भत्ता वाढ मंजूर करणे बाबत...

आदेश,

महानगरपालिका निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांना केंद्रशासकीय कर्मचा-यां प्रमाणे महागाई भत्ता लागू करणे बाबतचे धोरण उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये निश्चित केले आहे. सध्या म.न.पा.निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांना १३९% महागाई भत्ता देण्यात येत आहे. केंद्र शासनाने उपरोक्त वाचले क्र.२ चे ज्ञापानानुसार केंद्रीय कर्मचा-यांना दि. १/१/२०१८ पासुन १३९% ऐवजी १४२% व वाचले क्र.३ अन्वये दिनांक १/७/२०१८ पासुन १४२% एवजी १४८% प्रमाणे सुधारीत महागाई भत्ता वाढ करणेत आली आहे. त्यानुसार म.न.पा.कर्मचा-यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता वाढ मंजूर करणेत आली आहे. महानगरपालिका निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना सुधारीत महागाई भत्ता वाढ मंजूर करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे वाचले क्र.२, ३ नुसार दि.१/१/२०१८ पासुन १३९% ऐवजी १४२% व दि.१/७/२०१८ पासुन १४२% एवजी १४८% महागाई भत्ता वाढ माहे ऑक्टोबर २०१८ चे निवृत्ती वेतनात लागू करणेस मान्यता देत आहे. तसेच माहे जानेवारी २०१८ ते जुन २०१८ या कालावधीची १४२% प्रमाणे व जुलै २०१८ ते सप्टेंबर २०१८ पर्यंत १४८% प्रमाणे देय महागाई भत्ता फरकाची रक्कम माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये बँकेमार्फत अदा करावी. सदरचा खर्च **"पेन्शननिधी"** या लेखाशिर्षकातुन खर्ची टाकणेत यावा.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रत :- १ पेन्शन बील टेबल

Scanned by CamScanner